| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा - महसूल १ |
| क्र.२०२०/आरबी-१/डेस्क-२/टे-४/सिआर- | दिनांक १५.०३.२०२० |

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३) पोलीस अधीक्षक, नांदेड
४) जिल्हा क्रिडा अधिकारी, नांदेड
५) जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
६) सहायक संचालक, पुरातत्व विभाग, कैलाश नगर, नांदेड
७) अधीक्षक, श्री हजूरसाहीब सचखंड गुरुव्दारा बोर्ड, नांदेड
८) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
९) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
१०) सहायक करमणूक कर अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेच्या अनुषंगाने चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा, नाटयगृह, म्युझियम बंद ठेवणेबाबत.

**संदर्भः-** १) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे खंड २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

ज्याव्दारे त्यांनी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून राज्यातील सर्व जिल्हयात चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा, नाटयगृहे, म्युझियम दि.३१ मार्च,२०२० पर्यंत बंद ठेवणेबाबत निर्देश दिले आहेत.

Scanned by CamScanner

त्यामुळे साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे, त्या आधारे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी नांदेड जिल्हयातील सर्व चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा, नाटयगृहे, म्युझियम दि.३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश देत आहे.

तसेच, याबाबत आपण व्यापक प्रसिध्दी देवून उक्त निर्देशाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.

सदर कामाच्या अंमलबजावणीत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून हलगर्जीपणा निदर्शनास आल्यास संबंधितांविरुध्द कार्यवाही करुन/कार्यवाहीचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

Scanned by CamScanner